# - प्रेस नोट -

दि. ०८/०९/२०२६

## दिंडोशी पोलीस ठाणे - खुनाचा प्रयत्न

दि.०६/०९/२०२६ रोजी २०.३० ते २०.४५ वा.च्या दरम्यान फिर्यादी संजय हंसराज मौर्या, वय-३४ वर्षे, धंदा-राशन दुकान,रा.ठी.गोरेगाव(पु), मुंबई हे त्यांचे शॉप क्र २७/जी, संतोषनगर, गोरेगाव (पु), मुंबई येथील राशन दुकान बंद करण्यासाठी गेले असता सामानाचे वजन मोजण्याच्या कारणावरून अटक आरोपी क्रमांक ०१ पुरूष वय-२४ वर्षे, अटक आरोपी क्रमांक ०२ पुरूष वय-२० वर्षे, अटक आरोपी क्रमांक ०३ पुरूष वय-२३ वर्षे, अटक आरोपी क्रमांक ०४ पुरूष वय-२४ वर्षे व अटक आरोपी क्रमांक ०५ पुरूष वय-१९ वर्षे यांनी संगनमताने बेकायदेशीर जमाव करून फिर्यादी यांना शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली तसेच त्यापैकी अटक आरोपी क्रमांक ०१ याने फिर्यादी यांना जिवे मारण्याच्या उददेशाने दुकाना बाहेरील लाल रंगाचा लोखंडी सिलेंडर उचलुन फिर्यादी यांचे डोक्यामध्ये मारून त्यांना गंभीर जखमी केले तसेच अटक आरोपी क्रमांक ०४ याने त्याच्याकडील कुठल्यातरी शस्त्राने फिर्यादी यांच्या डोक्यामध्ये मारून त्यांना जखमी कले तसेच इतर तीन जणांनी त्यांना लाथाबुक्यांनी मारहाण केली म्हणुन फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दि.०७/०९/२०२६ रोजी गु.र.क्र. १००४/२६, कलम १०९(१),१८९(२),१९०, १९१(२),११५(१),११८(१),३५२, ३५१(२),३(५) बीएनएस २०२३ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

---------------------